दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# बादल वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र | शनिवार दि.८ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-११४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## लाडकी बहिणी योजनेच्या प्रसिद्धीसाठी ३ कोटींचा खर्च

**मुंबई**–लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला राज्यात मिळालेल्या यशाचे श्रेय लाडकी बहीण योजनेला दिले जाते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहिणी योजनेच्या प्रसिद्धीसाठी तीन कोटी रुपयांच्या खर्चाला राज्य सरकारच्या वतीने मान्यता देण्यात आली आहे. मात्र, दुसरीकडे वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आता शिव भोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या योजनांना ब्रेक लावण्याची शक्यता वर्तवली जात आहे.राज्य सरकारच्या लाकडी बहिण योजनेवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. मात्र या योजनेवर झालेल्या मोठ्या प्रमाणातील खर्चामुळे आता राज्य सरकार इतर काही योजना बंद करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. यात शिव भोजन थाळी आणि आनंदाचा शिधा अशा योजनांचा समावेश आहे. त्यामुळे या योजनांना आता ब्रेक लागणार असल्याचे बोलले जात आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना विधानसभा निवडणुकीच्या आधी जाहीर करण्यात आली होती. या योजनेला महिला वर्गातून मोठी लोकप्रियता मिळाली.

## एकनाथ शिंदेंचा मराठवाड्यात उद्धव ठाकरेंना मोठा धक्का

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी परभणी आणि वाशिम जिल्ह्यातील जिल्हाप्रमुखांचा शिवसेनेत प्रवेश

**नांदेड (वृत्तसंस्था)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाड्यामध्ये उद्धव ठाकरे गटाला पुन्हा एकदा मोठा धक्का दिला आहे. ठाकरे गटाचे परभणी आणि वाशिम जिल्ह्यातील जिल्हाप्रमुख यांनी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला हा मोठा धक्का मानला जात आहे. या दोन्ही जिल्ह्यातील प्रमुखांनी एकाच वेळी शिंदे यांच्या उपस्थितीत नांदेड येथे पक्षप्रवेश केला.


विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सध्या आभार दौरा काढला आहे. यानिमित्ताने नांदेड येथे त्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत उद्धव ठाकरे गटाचे परभणी जिल्हा प्रमुख विशाल कदम आणि वाशिम जिल्हा प्रमुख सुरेश मापारी यांनी देखील शिवसेना पक्षात प्रवेश केला. या दोन्ही पक्षप्रवेशामुळे शिवसेना शिंदे गटाची परभणी आणि वाशिम जिल्ह्यामध्ये मोठी ताकद वाढली आहे. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे गटाला हा मोठा झटका मानला जात आहे.पक्षात सर्वात मोठे पद हे शिवसैनिक आहे. त्यामुळे शिवसैनिकांना जपा, असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नांदेड जिल्हा आभार दौऱ्या दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर पालिका आणि महानगर पालिकेत देखील महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या सदस्य नोंदणीवर विशेष लक्ष देण्याचे आवाहन देखील त्यांनी कार्यकर्त्यांना केले.



# शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसीसाठी आवाहन

**जालना । असलम कुरेशी**

जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्याचा लाभ कायम रहावा यासाठी ई-केवायसी आणि मोबाईल सिडींग करुन घेणे आवश्यक आहे. तरी तहसील कार्यालयाकडून तालुक्यातील गावामध्ये ई-केवायसीसाठी जनजागृतीपर शिबीरे घेण्यात येणार आहेत. तरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांनी शिबीरात येवून ई-केवायसी अवश्य करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.




स्वस्त धान्य वितरण प्रणाली पारदर्शक व्हावी यासाठी शासनाने सुरु केलेल्या ई-केवायसीबाबत काही शिधापत्रिकाधारक उदासीन दिसत आहेत. ५ लाख ६५ हजार ७०० लाभार्थ्यांनी अद्यापही ई-केवासी केलेली नसल्याचे दिसुन आले आहे. तरी दि.२८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत ई-केवायसी न केल्यास या लाभार्थ्यांना स्वस्त धान्यापासून कायमचे वंचित राहण्याची वेळ येऊ शकते. लाभ मिळण्यासाठी अंत्योदय आणि प्राधान्य गटातील शिधापत्रिका धारकांच्या हाती आणखी काही दिवसाची अवधी आहे. आपल्या तालुक्यातील गावात ई-केवायसी सिडींग करुन घेण्यासाठी सर्व गावामध्ये शिबीर घेण्यात यावेत. अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. शिधापत्रिकाधारक व कुटूंबातील सदस्य स्वस्त धान्यापासुन वंचित राहू नये यासाठी ई-केवायसी करणे अत्यंत गरजेचे आहे. जालना-१३६९४२, बदनापुर-४९६४६, भोकरदन-७६२६१, जाफ्राबाद-३५५५१, मंठा-५५५६६, परतूर-५६९६४, अंबड-८७१६८, आणि घनसावंगी - ६७७०० याप्रमाणे तालुकानिहाय शिधा पत्रिकाधारक लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. असेही कळविले आहे.

# नाली बंद झाल्यामुळे दुर्गंधीयुक्त सांडपाणी आले रस्त्यावर

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई शहरातील मांडवा रस्ता भागात मुख्य रस्यावर सेफ्टीटॅकमधील मलमूत्र युक्त पाणी रस्त्यावरुन वाहत असल्यामूळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांना दुर्धर आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अण्णाभाऊ साठे चौकापासून मांडव्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेच्या नालीचे बांधकाम केलेले होते. फार पुवीपासून त्या नालीमधून या भागातील नागरिकांच्या घरातील



सांडपाणी जात होते परंतू तो नाला पूर्णपणे बंद (ब्लॉक) झाल्यामुळे पूढे जाणारे सर्व दुर्गंधीयुक्त पाणी रागीणी सोसायटी मधील रस्त्यावर रस्त्यावरुन सतत वाहत आहे. या पाण्यामूळे सर्व परिसरात दूर्गंधी पसरली असून नागरीकांना याचा खूपच त्रास सहन करावा लागत आहे. तसेच त्यामुळे रोगराई ही पसरण्याची भिती निर्माण झाली आहे. या संदर्भात वेळोवेळी संबधितांना निवेदने देण्यात आली होती परंतु कसलीही कार्यवाही झालेली दिसत नाही संबधितांनी या समस्येचे निराकरण करावे आणि रागिणी सोसायटीमधील नागरीकांना दुर्गंधीयुक्त पाण्याचा त्रासापासून मुक्त करावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे संबधित निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, अतिरिक्त जिल्हाधिकारी अंबाजोगाई, उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई तहसीलदार अंबाजोगाई मुख्याधिकारी, नगर परिषद अंबाजोगाई यांना पाठविण्यात आल्या असून त्यावर विमलाकर देशपांडे, सुधाकर गोसावी, सुरेश एस देशमुख, श्रीकृष्ण महाजन, महारुद्र काळे, सुगांवकर यांच्यासह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न राष्ट्रीय पुरस्कार इंजि.चंद्रप्रकाश देगलूरकरांना जाहिर

**जालना । असलम कुरेशी**

अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद या अराजकीय सामाजिक संघटनेचे संस्थापक इंजि.चंद्रप्रकाश गंगाधरराव देगलूरकर यांना आदिलाबाद (तेलंगणा) येथील गुरु रविदास समाज सेवामंडळाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न राष्ट्रीय पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.



गुरु रविदासांच्या ६२७ व्या जयंतीनिमित्त गुरु रविदास मंदिर, चिलकुरी लक्ष्मीनगर आदिलाबाद येथे राष्ट्रीय गुरु रविदास फेस्टिव्हल २०२५ चे आयोजन करण्यात आले असून त्यात प्रथमच यावर्षीपासून राष्ट्रीय पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली. यावेळेस रविदासीया आंबेडकरी कविसंमेलन ही आयोजित करण्यात आले आहे. गुरु रविदास अभिवादन यात्रेच्या माध्यमातून आदिलाबाद व तेलंगणा परिसरात सर्वप्रथम गुरु रविदासांच्या क्रांतिकारी विचारांची पेरणी करणारे इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांची यावर्षीच्या पहिल्या मानाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर हे परिवर्तनवादी विचारांचे निष्ठावान सामाजिक नेते, साहित्यिक, लेखक, पत्रकार व परखड व्याख्याते म्हणून प्रसिद्ध आहेत. रघुनाथ ईटकरे, दादाराव कदम, डॉ. अलका गव्हाळे, सुकुमार पेटकुले यांनाही हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे या फेस्टिव्हलचे अध्यक्ष कवी मधू बावलकर यांनी कळविले आहे.

# लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी निघालेल्या बोलेरो गाडीचा सांगवी सारणी पाटीजवळ अपघात

## नवरी मुलीच्या वडिलांसह दोन ठार,नऊ जखमी

**केज । प्रतिनिधी**

दि.७ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार रोजी कासारी येथील कुटुंब लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी अहिल्यानगरला जात असताना बोलेरो गाडीला टेम्पोने धडक दिल्याने सांगवी पाटीजवळ असणाऱ्या पुलावर सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

अपघातात नवरी मुलीचे वडील व नातेवाईक महिलेचा मृत्यू झाला.व इतर तीन जण गंभीर रित्या जखमी तर सहा जण किरकोळ जखमी झाले आहेत.याबाबत सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील कासारी येथील



रामेश्वर शाहूराव डोईफोडे यांच्या मुलीचे दि.२२ फेब्रुवारी रोजी लग्न होते.त्या अनुषंगाने लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी डोईफोडे कुटुंब व इतर नातेवाईक अहिल्यानगर कडे निघाले होते.केज मांजरसुंबा रोड वरील सांगवीसारणी पाटी जवळ पुलाच्या पुढील वळणावर बोलेरो जीप व टेम्पोचा अपघात झाला. या अपघातात मुलीचे वडील रामेश्वर डोईफोडे व नातेवाईक उर्मिला श्रीराम घुले(कोरेगाव) यांचा मृत्यू झाला.तसेच चालक अजय डोईफोडे,लक्ष्मण डोईफोडे,उत्तम डोईफोडे, राम डोईफोडे,प्रवीण डोईफोडे यांच्यासह अन्य चार जण जखमी झाले आहेत.लग्न घरातील नवरी मुलीच्या वडिलांसह नातेवाईक महिलेचा मृत्यू झाल्याने डोईफोडे कुटुंबा वर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.तसेच सर्व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# कॉपीमुक्त अभियानासाठी नायगाव तालुका दक्षता समितीची बैठक संपन्न

**नायगाव । प्रतिनिधी**

तालुका दक्षता समिती नायगाव अध्यक्षा तथा तहसीलदार तहसील कार्यालय नायगाव यांच्या अध्यक्षतेखाली इयत्ता १२ वी फेब्रुवारी / मार्च २०२५ परीक्षा संदर्भात दक्षता समिती ची बैठक तहसील कार्यालय नायगाव येथे ५ फेबूरवारी रोजी संपन्न झाली.

यामध्ये राज्यशासनाच्या शिक्षण विभागाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यातील मुद्द्यानुसार इयत्ता १० वी / १२ वी फेब्रुवारी/मार्च २०२५ च्या परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात पार पडतील यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. परिरक्षक कार्यालय, नायगाव अंतर्गत येणाऱ्या सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीतपणे पार पडेल, कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब होणार नाही यासाठी महसूल प्रशासन, पंचायत समिती विभाग, शिक्षण विभाग यांच्या समन्वयातून बैठे पथक, भरारी पथक यांचे नियोजन करण्यात येईल.परीक्षे दरम्यान परीक्षा केंद्र असलेल्या परिसरात व गावात झेरॉक्स सेंटर सुरू असणार नाही. असल्यास झेरॉक्स सेंटरला सील करण्यात येईल.पर्यवेक्षकांची नियुक्ती



केंद्र बदलून मिळणार. दिलेल्या परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षक पूर्ण वेळ उपस्थित राहून केंद्र संचालकास सहकार्य करतील. पर्यवेक्षक उशिरा आल्यास किंवा अनुपस्थित असल्यास त्यांच्यावर कायदेशीर रित्या कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. सर्व केंद्रसंचालक यांनी परीक्षा केंद्रावर दालन व्यवस्था, बैठक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुरेपुर असल्याची खात्री करण्यात यावी. अशा सूचना मा. श्रीमती धम्मप्रिया गायकवाड (तहसीलदार, नायगाव) यांनी बैठकीदरम्यान दिल्या. तालुका दक्षता समितीच्या बैठकीत मा. गटविकास अधिकारी लक्ष्मण वाजे (पंचायत समिती नायगाव), मा. संग्राम कांबळे, (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, नायगाव), परिरक्षक श्री आनंद रेनगुंटवार व इयत्ता १२ वी परीक्षा केंद्राचे सर्व केंद्र संचालक उपस्थित होते.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आनेगाव येथे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील आनेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविधगीतांचे वैविध्यपूर्ण प्रदर्शन करून प्रेक्षकांची मने जिंकली.

विद्यार्थ्या सोबतच पालकांनी ही सहभागी होऊन विविध गुण दर्शनांना वाव दिला. यामध्ये पालकांनी विविध नाटके सादर केली. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.लक्ष्मण लाखे, प्रमुख पाहुणे ज्येष्ठशिक्षण विस्तार अधिकारी श्री. सुनील केंद्रे होळ,केजचे केंद्रप्रमुख श्री.चौरे युसुफ वडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.बोराडे,डॉ.हनुमंत सौदागर आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे विस्तार अधिकारी सुनील केंद्रे म्हणाले कि,स्नेह संमेलन कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो यामधून त्यांचा सर्वांगीण विकास होतो असे मत त्यांनी व्यक्त केले.शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य यांची तसेच समस्त गावकऱ्यांची उपस्थिती होती.पालकांनी



सादर केलेल्या नाटकातून प्रथम क्रमांक-जैसी करनी वैसी भरणी,द्वितीय क्रमांक-अकरा रुपये ठेवा अंगात आला देवा,तृतीय क्रमांक -काळ्या आईची व्यथा या नाटकाना मिळाले. पालकांनी सादर केलेल्या नाटकाचे परीक्षण श्री. लाखे,श्री.मुळे,श्री.गुजर यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या माजी विद्यार्थिनी कु. ज्ञानेश्वरी गवळी व श्रद्धा हंडीबाग यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.पौळ श्री.मांगडे व श्रीमती पूनम हंडीबाग यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय..

## माती जपली नाही, तर



भारतात शेती हा अजूनही बहुतांश लोकांच्या उपजीविकेचा स्रोत आहे. १.७८ दशलक्ष चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये पसरलेल्या जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या कृषी प्रणालीचा आधार आहे. मातीची धूप होण्याची गंभीर समस्या धान्य उत्पादनावरच परिणाम करत नाही, तर हवामान बदलाच्या युगात अनेक समस्यांचे मूळ बनत आहे. त्यात प्रामुख्याने पर्यावरणीय असंतुलनाचा समावेश होतो.

माती किंवा जमिनीच्या वर उपलब्ध असलेले सैल आणि मऊ घटक बियाणे अंकुरित करतात, मुळे फुटतात आणि झाडे आणि पिके वाढवतात ही आपल्या पृथ्वीवरील जीवनाची प्रातिनिधिक ओळख आहे. आजच्या युगात, आठ अब्ज लोकांसाठी अन्न उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी बिघडत चाललेल्या परिसंस्थेचा समतोल राखणे आवश्यक आहे. हवामान संकट मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी झाडे आणि पिके हा एक मजबूत सक्षमकर्ता आहे; परंतु आज निसर्गाचे अस्तित्व, स्थिर आणि जंगम आणि प्राण्यांसाठी पोषक माती गंभीर धोक्यात आहे. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप केवळ कृषी उत्पादन आणि अन्न सुरक्षेवर परिणाम करत नाही, तर हवामान बदलाची समस्या अधिक व्यापक आणि जटिल बनवत आहे. मातीचा ऱ्हास, उत्पादन क्षमतेत घट आणि आधुनिक कृषी पद्धतींमुळे या समस्येची व्याप्ती दिवसेंदिवस नवीन क्षेत्रांमध्ये पसरत आहे. 'नॅशनल ब्यूरो ऑफ सॉईल सर्व्हे'नुसार, भारतातील सुमारे एक तृतीयांश माती म्हणजे सुमारे १२० दशलक्ष हेक्टर मातीची धूप झाली. तिचा एक महत्त्वपूर्ण भाग सागरी क्षारीकरणामुळे प्रभावित झाला आहे. भारतातील बहुतेक राज्ये मातीची धूप होण्यामुळे प्रभावित आहेत. पंजाब, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप होत असूनही, तंत्रज्ञानावर आधारित शेतीमुळे अन्न उत्पादनात वाढ झाली आहे. भारत आता कृषी उत्पादनाचा दुसरा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आहे; परंतु कुपोषण ही अजूनही एक गंभीर समस्या आहे. पुराच्या वेळी मोठ्या प्रमाणावर मातीची धूप आणि बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात जमिनीचा वापर, रासायनिक खतांच्या मोठ्या प्रमाणावर वापरामुळे क्षारता जमा होणे, वाढती आंलता आणि पाणी साचणे इत्यादींमुळे शेतीयोग्य जमिनीचा मोठा भाग नापीक होत आहे; परंतु मातीची अशीच झीज होत राहिल्यास, येत्या काही वर्षांमध्ये अन्न आयात करावे लागेल.

जगातील केवळ २.४ टक्के भूभाग असलेला भारत जगाच्या १८ टक्के लोकसंख्येला अन्न पुरवतो. अनियंत्रित शेती व्यतिरिक्त, मातीची धूप होण्याची प्रमुख कारणे म्हणजे मोठ्या प्रमाणावर शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीच्या वापरात होणारा व्यापक बदल. त्यात अविवेकी जंगलतोडदेखील समाविष्ट आहे. यासोबतच जनावरांच्या संख्येच्या बाबतीतही भारत हा सर्वात मोठा देश आहे. जनावरे चरताना जमिनीच्या वरच्या वनस्पती थराचा ऱ्हास होतो. वनस्पती काढून टाकल्यामुळे मातीचा वरचा थर कमकुवत होतो आणि पाऊस तसेच वाऱ्यामुळे मातीची धूप होते. भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा देश आहे आणि दीड अब्ज लोकांच्या पोटापाण्यासाठी लागणारे धान्य उत्पादन करण्यासाठी कृषी व्यवस्थेवर सतत दबाव असतो. या सर्वांचा परिणाम संपूर्ण कृषी व्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या मातीवर होतो. सध्या शेतीमध्ये ९४ टक्के रासायनिक खतांचा वापर केला जातो. रासायनिक कीटकनाशके आणि खतांच्या अतिवापरानेही शेतात आणि पिकांना विषबाधा झाली. भारत हा कीटकनाशकांचा सर्वात मोठा उत्पादक आणि वापरकर्तादेखील आहे. हरितक्रांतीच्या काळात आपले अन्नधान्य उत्पादन ५० दशलक्ष टनांवरून ३०० दशलक्ष टनांपर्यंत वाढले; परंतु हे यश सुपीक मातीची किंमत मोजून मिळालेले दिसते. अशा परिस्थितीत, जलद मातीचा नाश भारताच्या वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नसुरक्षेचे गंभीर संकट निर्माण करू शकते. मातीची धूप झाल्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होतेच; पण नैसर्गिकरीत्या जमिनीत असलेल्या कार्बनचे प्रमाण कमी झाल्यामुळे पाणी शोषून घेण्याची आणि धरून ठेवण्याची क्षमताही मोठ्या प्रमाणात कमी होते. परिणामी, पाऊस आणि इतर स्त्रोतांमधून पाण्याचे पुनर्भरणदेखील लक्षणीय प्रमाणात कमी होते. त्यामुळे भारतातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात कमी होते.

कृषी-आधारित अर्थव्यवस्था भारताचे जागतिक आर्थिक चढ-उतारांपासून संरक्षण करते, म्हणूनच गेल्या काही दशकांमध्ये आलेल्या मोठ्या जागतिक मंदीच्या काळातही भारतीय अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम न होता वेगाने वाढ होत राहिली. एकूणच, असे म्हणता येईल की मातीची धूप 'डोमिनो इफेक्ट' आहे. त्यामुळे नैसर्गिक, सामाजिक आणि आर्थिक प्रक्रियांवर नकारात्मक परिणाम होतो. हे स्पष्ट आहे की आजच्या काळात माती हे सर्वात महत्त्वाचे संसाधन आहे. भारतासारख्या देशासाठी ती केवळ पोट भरण्यासाठी आवश्यक नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. अशा परिस्थितीत, नैसर्गिक पद्धतीने जमिनीची सुपीकता परत आणण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्याला मातीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक आरोग्य पुनर्संचयित करावे लागेल. सध्या, वापरल्या जात असलेल्या एकूण खतांपैकी फक्त सहा टक्के ही सेंद्रिय स्त्रोतांची खते आहेत. त्यामुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय खतांवर आधारित शेतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे; मात्र यामध्ये धान्य उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. भारत हा केवळ कृषीप्रधान देश नाही, तर समृद्ध निसर्ग-केंद्रित कृषी परंपरादेखील आहे. ती मातीची क्षमता, हवामान, पाण्याची उपलब्धता यांच्या सुसंवादावर आधारित आहे. ती पुनरुज्जीवित झाल्यास माती, पाणी आणि हवेची गुणवत्ता पुन्हा रुळावर आणली जाऊ शकते; पण त्यासाठी माती, पाणी आणि सार्वजनिक आरोग्य केंद्रस्थानी ठेवून आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन धोरणे आखावी लागतील. त्यासाठी वैज्ञानिक विचारांची, तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्याची आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. गेल्या काही दशकांमध्ये, सरकारी पातळीवर केलेले प्रयत्न हे केवळ कृषी उत्पादन आणि त्याच्या आर्थिक पैलूंवरच राहिले आहेत. मातीचे आरोग्य हा शेतकऱ्यांच्या अजेंड्यावरचा विषय दिसत नाही, हे अलीकडच्या काही शेतकरी आंदोलनांच्या मागणीवरून समजू शकते. मातीची स्थिती बिघडण्याच्या जटिल समस्येवर कोणताही सोपा उपाय नाही आणि माती आणि पाण्याची समस्या आमच्या शेतातून भोजन थाळीपर्यंत पोहोचली आहे. अशा परिस्थितीत या भीषण समस्येची दखल घेऊन शासन, समाज आणि वैयक्तिक पातळीवर प्रयत्न करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

# खाद्यपदार्थ ऑनलाईन खरेदीची रिटर्न पॉलिसी तपासा

हल्ली सर्वांचे ऑनलाईन खरेदीचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यात बहुत करून कपडे, इलेक्ट्रॉनिक्स व घरगुती उत्पादने आणि खाद्यपदार्थ या वस्तू खूपच प्रमाणात खरेदी केल्या जातात. कपडे आणि इतर उत्पादने खरेदी करताना त्याचे माप, त्याचा रंग किंवा त्याची वैशिष्ट्ये आपल्याला योग्य वाटली नाहीत किंवा आवडली नाहीत तर आपण ती वस्तू परत करण्याची सोय आहे का हे विकत घेण्यापूर्वी अगदी आवर्जून बघतो. खाद्यपदार्थ खरेदी करताना कदाचित ही रिटर्न पॉलिसी नीट बघितली जात नसावी. पण हीच आपली चूक नंतर महागात पडू शकते. कारण आपण ठरावीक खाद्यपदार्थ आपल्याला हव्या त्या ब्रँडचा आणि योग्य त्या मात्रेत खरेदी करतो.




मुंबईत राहणाऱ्या एका महिलेकडून असे दुर्लक्ष झाले. तिने न्यूट्रिशन फ्रेश एनर्जी ड्रिंक मिक्स लिंबू फ्लेवरचे १३ डबे एका ई-कॉमर्स माध्यमातून ऑक्टोबर २०२३ मध्ये खरेदी केले. त्याची किंमत होती ४६४१ रुपये. हे डबे त्याच महिन्यात या महिलेला घरपोच मिळाले. जेव्हा ते डबे तिने उघडले तेव्हा तिच्या लक्षात आलं की या शक्तिवर्धक पेयाचा रंग आणि पोत नेहमीसारखा नाही. शिवाय त्या डब्यावरील लेबलवर क्यूआर कोड सुद्धा छापलेला नाही. या सर्व गोष्टी पाहिल्यावर तिला हे उत्पादन बनावट व नकली वाटले आणि त्यामुळे ते तिने ई-कॉमर्स कंपनीला परत करण्याचा निर्णय घेतला. पण त्या ई-कॉमर्स कंपनीने तिची विनंती रद्दबादल ठरवली, कारण एकदा विकलेले उत्पादन परत न घेण्याची त्यांची पॉलिसी होती. (छे ीशींीप ॅश्रिळलू). त्यानंतर तिने या कंपनीच्या ग्राहक सेवा देणाऱ्या नंबरवर हा बनावट खाद्यपदार्थ परत करण्याबद्दल बरेचवेळा तक्रार केली, पण तिला तिच्या तक्रारीचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही आणि पेय परतही करता आले नाही.

शेवटी तिने मुंबईतील ग्राहक न्यायालयात उत्पादक आणि ई-कॉमर्स माध्यम विक्रेता या दोघांच्याही विरुद्ध निकृष्ट दर्जाचे उत्पादन परत न घेतल्याबद्दल खटला दाखल केला. तेव्हा तक्रारदार महिलेने असा युक्तिवाद केला की, तिला मिळालेले उत्पादन निकृष्ट दर्जाचे होते आणि ते परत न घेणे म्हणजे ही त्यांची अनुचित व्यापार पद्धत आहे. केसच्या सुनावणीच्या वेळी आपले म्हणणे मांडताना पुरावा म्हणून तक्रारदार महिलेने त्या शक्तिवर्धक पेयाचे फोटो आणि ते उत्पादन परत घेण्यास नकार देणारे त्या कंपनीचे लेखी संदेश मुंबईतील जिल्हा ग्राहक आयोगापुढे सादर केले आणि ५० लाखांची नुकसानभरपाई मागितली. ऑनलाइन शॉपिंग फसवणूक, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मद्वारे होणारी फसवणूक, डिजिटल पेमेंट फसवणूक यापासून ग्राहकांना संरक्षण देण्यासाठी ग्राहक संरक्षण कायदा-१९८६ ची जागा ग्राहक संरक्षण कायदा २०१९ ने घेतली आहे.

ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी या कायद्यान्वये ई-कॉमर्स नियम तयार केले आहेत. यामध्ये 'उत्पादन दायित्व' हे महत्त्वाचे प्रावधान आहे. या तक्रारीचा अभ्यास करताना आयोगाने निष्कर्ष काढला की, कोणतीही ई कॉमर्स कंपनी तिच्या माध्यमातून विकल्या जाणाऱ्या उत्पादनाच्या दर्जासाठी ती जबाबदार आहे. तसेच ही कंपनी आणि विक्रेता सेवेतील कमतरता आणि अनुचित व्यापारी प्रथा या दोन्ही गोष्टी केल्यामुळे दोषी आहेत. त्यामुळे तक्रारदार महिलेला ४६४१ रुपये, ऑक्टोबर २०२३ पासून ९% व्याजासहित देण्याचे ग्राहक न्यायालयाने दोघांनीही आदेश दिले. शिवाय या खटल्याचा खर्च म्हणून रुपये १० हजार देणे बंधनकारक केले. पण ५० लाख रुपयांचा नुकसानभरपाई मिळण्याचा तिचा दावा मात्र मान्य केला गेला नाही, कारण त्या पेयात आरोग्यासाठी हानिकारक घटक पदार्थ आहेत हे तक्रारदार महिला सिद्ध करू शकली नाही. आपण ई कॉमर्स कंपनीच्या माध्यमातून खरेदी करतो तेव्हा, कपडे किंवा वस्तू घेताना त्या परत करण्यासाठी किती दिवस आहेत किंवा त्याची पद्धत काय आहे हे आवर्जून तपासतो. पण वरील उदाहरणावरून आता या माध्यमांतून खाद्यपदार्थ विकत घेतानासुद्धा त्याची रिटर्न पॉलिसी नीट पाहायला हवी. त्यांच्या सर्व अटी आणि शर्ती (ढशीाी उेपवळींळेपी) नीट समजून घेऊनच खरेदी करायला हवी.

समजा काही कारणाने ग्राहकांची फसवणूक झालीच तर जागरूक ग्राहक बनून ई कॉमर्स कंपनी किंवा प्रत्यक्ष विक्रेता असेल तरी आपल्या योग्य उत्पादन मिळण्याच्या हक्कासाठी ग्राहक न्यायालयात दाद मागितली पाहिजे. जिल्हा, राज्य किंवा राष्ट्रीय ग्राहक आयोगाकडे खटला लढवताना ग्राहक आपली बाजू स्वतः मांडू शकतो. त्यासाठी वकिलाची आवश्यकता नसते. मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे ग्राहकांच्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारीसाठी तक्रार मार्गदर्शन केंद्रे विनामूल्य चालवली जातात. इथे ग्राहकांना त्यांची तक्रार सोडविण्यासाठी सर्व प्रकारची माहिती देऊन सक्षम केले जाते. तसेच त्रस्त ग्राहक मध्यस्थीमार्फत तक्रारी सोडवण्यासाठी संस्थेच्याच 'समेट'चा उपयोग करू शकतात.

# क्रीडा महोत्सवाचा काळ

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विभाग व विविध पदवी अभ्यासक्रम असो, दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यासाठी शालेय क्रीडा समिती स्थापन करण्यात येते. त्याला अनुसरून शाळेतील मुलांची पटसंख्या लक्षात घेऊन गट तयार केले जातात. त्यानंतर त्या गटांना नावे व त्या गटांचा गट प्रमुख निवडला जातो. गटांच्या गट प्रमुखांची निवड झाल्यानंतर प्रत्येक गटाचे गट प्रमुख इतर विद्यार्थ्यांची आपल्या गटात निवड करतात. काही वेळा विद्यार्थ्यांच्या नावाच्या चिठ्या तयार करून एका बॉक्समध्ये ठेवल्या जातात. त्यानंतर गट प्रमुख एक चिठ्ठी उचलतो. त्या चिठ्ठीत ज्याचे नाव असेल तो त्या गटात. काही वेळा एकमेकांच्या सहमताने गटात विद्यार्थी घेतले जातात. काही ठिकाणी दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा लक्षात घेऊन शालेय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना इजा होऊ नये म्हणून सहभागी करून घेत नाहीत. मात्र असे न करता सर्व विद्यार्थ्यांना अशा खेळात सहभागी करून घेतले पाहिजे. मागील वर्षी छत्रपती संभाजीनगर येथील तनिषा बोरामणीकर हिने बुद्धिबळ खेळात राष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामगिरीमुळे इयत्ता १२ वीमध्ये (वाणिज्य विभाग) १०० टक्के गुण मिळवले. तिला ६०० गुणांपैकी ५८२ गुण मिळाले होते. मात्र तिला १८ क्रीडा गुण दिल्याने तनिषा हिला बारावीमध्ये १०० टक्के गुण मिळाले. तेव्हा विद्यार्थ्यांनी खेळाकडे दुर्लक्ष करू नये. मला पण बी. एड. प्रवेशाच्या वेळी क्रीडा गुणामुळे ३ टक्के गुण वाढले होते.



शालेय किंवा महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवामध्ये सांघिक व मैदानी खेळ असतात. सांघिक खेळामध्ये कबड्डी, खो-खो, क्रिकेट, हॉलीबॉल, बास्केटबॉल, हॉकी, लंगडी तर मैदानी खेळात १००, २०० व ४०० मी धावणे, उंच उडी, लांब उडी, भाला फेक, थाळी फेक, गोळा फेक इत्यादींचा समावेश असतो. हा क्रीडा महोत्सव तीन ते पाच दिवस चालतो. विशेष म्हणजे या खेळांसाठी पंच म्हणून माजी विद्यार्थी किंवा आपल्या परिसरात बीपीएड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना निमंत्रित केले जाते. यात ज्या गटाला अधिक गुण मिळतात त्या गटाला वार्षिक बक्षीस वितरण समारंभामध्ये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव केला जातो, तर वैयक्तिक खेळामध्ये ज्या खेळाडूचे अधिक गुण होतात त्याला त्या वर्षाचा 'चॅम्पियन' म्हणून त्याचा खास सन्मान करण्यात येतो. त्याचप्रमाणे शाळेच्या स्मरणिकेत त्याचा फोटो सुद्धा छापला जातो. यामुळे नवीन विद्यार्थ्यांना एक प्रेरणा मिळते. तसेच ज्या विद्यार्थ्याचा फोटो छापून आल्यावर त्यांचा एक प्रकारे उत्साह वाढत असतो. आपण तालुका अथवा जिल्हा स्तरावर खेळात भाग घेऊ शकलो नाही. मात्र शालेय स्तरावर आपण चांगली कामगिरी केली याचे सुद्धा त्यांना समाधान वाटते. अशा खेळातून प्रोत्साहन मिळाल्यामुळे अभ्यासाकडे अधिक लक्ष देऊन चांगले गुण संपादन करतात. शालेय खेळामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाला व अभ्यासाला चांगली गती मिळते. तेव्हा विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महत्त्वाची बाब म्हणजे सध्या काही शाळांना मैदान नसल्यामुळे काही ठरावीक विद्यार्थ्यांना गाडीने घेऊन भाड्याने घेतलेल्या मैदानावर स्पर्धा आयोजित करतात. त्यामुळे इच्छा असून सुद्धा सरावाचे कारण पुढे करून अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थी सहभागी होणे टाळतात.

सध्याच्या परिस्थितीत विशेषतः शहरात बंदिस्त शिक्षण चालते. शाळेत एकदा मुले गेली की बाहेरून गेटला कुलूप लावून घेतले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोकळेपणा वाटत नाही. याचा परिणाम आवड असून सुद्धा मुले अशा महोत्सवात भाग घेत नाहीत. यासाठी शाळेची स्थापना करीत असताना त्या शाळेचे स्वतःचे मैदान असले पाहिजे. अन्यथा शासन मान्यता देण्यात येऊ नये. आज अनेक नवीन शाळांना स्वतंत्र मैदान नसल्यामुळे खेळाची आवड असून सुद्धा खेळामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होता येत नाही. शेवटी सराव महत्त्वाचा असतो. जर नियमित खेळाचा सराव नसेल तर एक दिवस खेळल्यावर दुसऱ्या दिवशी काय होते याची कल्पना विद्यार्थ्यांना असते. त्यामुळे खेळामध्ये असे अनेक विद्यार्थी सहभागी होत नाहीत. तेव्हा विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर त्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळण्यासाठी प्रत्येक शाळेच्या मालकीचे मैदान असावे. जर शाळेचे मैदान असेल तरच उत्कृष्ट व शिस्तबद्ध खेळाडू निर्माण होऊ शकतात. याचा परिणाम आपला देश ऑलिम्पिक पदकांमध्ये आपण मागे आहोत. तेव्हा डिसेंबर महिना हा क्रीडा महोत्सवाचा काळ असला तरी त्यातील विविध खेळांत विशेष प्रावीण्य विद्यार्थ्यांनी मिळविले असेल तर त्याच्या क्रीडा गुणांना वाव मिळण्यासाठी शाळा व्यवस्थापकांनी पुढाकार घ्यावा. त्याचबरोबर त्या विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होणार नाही याकडे अधिक लक्ष द्यावे. तसेच क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळवून द्यावा. यासाठी ८ ते १४ वयोगटातील मुलांची निवड करतात.

राज्यातील क्रीडा प्रबोधिनीचे प्रमुख उद्दिष्ट आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करणे होय. राज्यात महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रीडा प्रबोधिनीची स्थापना ३१ जानेवारी १९९६ रोजी करण्यात आली असून राज्यात ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे मुलांच्या पालकांनी चौकशी करून क्रीडा प्रबोधिनीचा लाभ घ्यावा. असे असले तरी विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरील क्रीडा महोत्सवामध्ये आपले क्रीडा कौशल्य दाखवावे लागेल.

# खरेदी केंद्र बंद ; जिल्ह्यात लाखो टन सोयाबीन खरेदीविना

## शेतकऱ्यांनो लढाई शिवाय पर्याय नाही-अजय बुरांडे

**परळी । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने दिलेला खरेदी कोटा पूर्ण झालेला नसताना एकूण बीड जिल्ह्यातील नाफेडकडील ४४ हजार ७४४ या नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी फक्त २० हजार ९६९ एवढ्याच शेतकऱ्यांचा माल खरेदी केलेला आहे. म्हणजे ५०% सुद्धा शेतकऱ्यांचा माल खरेदी न करता देखील तारखांचे दाखले देऊन शासकीय खरेदी केंद्र बंद करण्यात आले आहेत.सोयाबीन हमीभावाने पूर्ण खरेदी सरकने करावी यासाठी पुन्हा रस्त्यावर उतरून लढाई करावी लागणारी आहे अशी खंत किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांनी व्यक्त केली आहे.

सत्तेत आलेल्या महायुतीच्या सरकारने निवडणुकीत सोयाबीनला ६ हजार रुपयांचा हमीभाव असे आश्वासन दिले होते. त्यानंतर राज्यसरकारने प्रतिक्विंटल ६,९४५ रु हमीभाव शिफारस केलेली असताना केंद्रसरकारकडून ४,८९२ रु हमीभाव जाहीर केला होता परंतु शासकीय खरेदी केंद्रावर शेतमाल विकलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा हमाली-काढता-बारदाना या नावाखाली प्रतिक्विंटल १५० ते २०० रुपयाला शेतकऱ्यांचा खिसा मारून, जाहीर केलेला हमीभाव सुद्धा न देण्याचे पाप या सरकारने केले असून आणि आत्ता तर थेट शासकीय खरेदी केंद्र बंद तारखेचा दाखला देत बंद करण्यात आली आहेत. काल पर्यंत रस्त्याच्या रांगेत उभ्या असलेल्या सोयाबीनचा हमीभावानुसार ४,८९२ प्रतिक्विंटल असलेला भाव आत्ता खाजगी व्यापाऱ्याकडे ३,८०० रु सुद्धा मुश्किलीने विकावा लागत आहे. अन्यथा वर्षभर सोयाबीन घरात सांभाळावी लागेल. अशाप्रकारे शेतकऱ्यांना चिमटीत पकडून आत्मनिर्भरतेची दवंडी सरकार वाजवत आहे. भारतामध्ये तेलबियांची गरज खूप मोठी आहे. देशातील वाढती लोकसंख्या आणि लोकांच्या बदलत्या आहारामुळे तेलबियांच्या मागणीत वाढ झाली आहे. देशात दरवर्षी सुमारे ३५० लाख टन तेलबियांची आवश्यकता असते.भारतातील तेलबियांचे उत्पादन गरजेपेक्षा कमी असल्याने, मोठ्या प्रमाणात तेलबियांची आयात करावी लागते. आपली आयात गुणवत्ता ६०% ते ६५% इतकी आहे.तेलबियांच्या आयातीमुळे दरवर्षी सुमारे ७० ते ८० हजार कोटी रुपये तेलबियांच्या आयातीवर खर्च होतात.हे अवलंबित्व कमी करण्यासाठी आत्मनिर्भरतेचे पोकळ प्लॅन बनवले जातात, पण योग्य अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे वेळोवेळी आयात वाढत जात असताना आपल्याच देशातील शेतकऱ्यांचा माल तारखांच्या आकडेवारीवरून खरेदी करण्याचे थांबवणे म्हणजे आरोपीला न्यायालयाने तारखाच्या कचाट्यात अडकाव त्याचप्रमाणे हे सरकार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी वागत आहे.त्यामुळं सोयाबीन पिकवणे गुन्हा आहे कि काय असे भासू लागले आहे.

वेळोवेळी, या प्रश्नांची उकल करून निवेदन- चर्चा करून देखील जर सरकार त्याच चालीवर राहणार असेल तर शेतकरी भावा-बहिणींनो कायदे आणि धोरण ठरवणाऱ्या, खुर्च्या आपल्याशी सावत्र वागत असतील तर आत्ता आपल्याला रस्त्यावर यावं लागेल. आणि आपण पिकवलेल्या माल हमीभावानेच खरेदी करण्यासाठी या सरकारला भाग पाडावे लागेल.हा एकच मार्ग सरकारने आपल्यासमोर ठेवला आहे. आज सोयाबीन उत्पादक शेतकरी जात्यात आहे परंतू इतर सगळे शेतकरी सुपात आहेत हीच वेळ उद्या कापूस हरभरा तूर या सर्वच शेतकऱ्यांवर येऊ नये म्हणून या सरकारची कोंडी करण्यासाठी सर्व शेतकरी, शेतकरीपुत्रांनो कंबर कसून लढण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन अखिल भारतीय किसान सभा बीड जिल्हा कमिटी करत आहे.



# अवैध दारू विरोधी कारवाईत कर्मचाऱ्याचा मृत्यू: कुटुंबाला साडेसात लाख नुकसान भरपाई

## उत्पादन शुल्क मंत्री अजित पवारांची माहिती

**मुंबई (वृत्तसंस्था)**-अवैध दारू विरोधी कारवाईत मृत्युमुखी पडलेल्या नाशिक येथील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयातील जवान तथा वाहन चालक कैलास गेणू कसबे यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून विशेष बाब म्हणून साडेसात लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकरणांमध्ये सत्वर मदत होण्याच्या दृष्टीने गृह विभागाच्या धर्तीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कायमस्वरुपी धोरण तात्काळ करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री आणि राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी दिली.नाशिक राज्य उत्पादन शुल्क विभाग भरारी पथक क्रमांक १ मधील अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अवैधपणे मद्यविक्री करणाऱ्या ढाब्यावर ७ जुलै २०२४ रोजी रात्री कारवाई केली होती. अवैध मद्यविक्री करणाऱ्या आरोपींच्या वाहनाचा पाठलाग करीत असताना राज्य उत्पादन शुल्क नाशिक यांच्या भरारी पथकाच्या वाहनाला आरोपींच्या वाहनाने धडक दिली व त्यामध्ये जवान तथा वाहनचालक कैलास गेणू कसबे यांचा मृत्यू झाला होता.उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी या खात्याचा कार्यभार घेताच या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घातले. त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सन २०१४ मध्ये गृह विभागाने केलेल्या मदतीच्या धर्तीवर (पोलिस दलातील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय ठरल्याप्रमाणे साडेसात लाख रुपये) राज्य उत्पादन शुल्क विभागातील दिवंगत जवान कैलास कसबे यांच्या वारसांना विशेष बाब म्हणून ७.५० लाख नुकसान भरपाई मंजूर केली आहे.दरम्यान, संबंधित मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबाला विभागाकडून मदत देऊ, अशी घोषणा तत्कालीन उत्पादन शुल्क मंत्री शंभुराजे देसाई यांनी केली होती. तसेच, आमची जी मोहीम सुरू आहे ती अशीच सुरु राहील. कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्याचा जीव घेणे योग्य नाही. यावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचेही त्यांनी म्हटले होते.



## संजय राऊतांना जादूटोण्यातील जास्त अनुभव

# त्यांच्या आरोपांवर बोलण्याची मला आवश्यकता नाही-उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अद्यापही मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यात राहायला न गेल्यामुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्याकडून टीका केली जात आहे. वर्षा बंगल्याच्या परिसरामध्ये जादूटोणा केल्याचा आरोप त्यांनी केला होता. या आरोपांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केवळ एका वाक्यात प्रतिक्रिया दिली. संजय राऊत यांना त्याच्यातला जास्त अनुभव आहे, याबाबत त्यांनाच विचारा, असा टोला एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांना लगावला.मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प आज जाहीर करण्यात आला. या अर्थसंकल्पाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज माध्यमांशी संवाद साधत प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांना संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांवर प्रश्न विचारला असता, त्यांनी संजय राऊतांच्या आरोपावर बोलण्याची मला आवश्यकता नाही, अशी प्रतिक्रिया देत जास्तीचे बोलणे टाळले.

संजय राऊत यांच्या आरोपांवर बोलण्याची मला आवश्यकता वाटत नाही. संजय राऊत यांना जादूटोण्यातील खूप जास्त अनुभव आहे. त्यामुळे वर्षा बंगल्याबाबत खरे काय आणि खोटे काय हे त्यांनाच विचारा, असे एकनाथ शिंदे म्हणाले.महाराष्ट्रात युसीसी लागू होणार का? असा प्रश्न विचारला असता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आम्ही सर्व जण यावर बसून चर्चा करू. त्यानंतर निर्णय घेऊन असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.मुंबई महापालिकेच्या ठेवी महायुतीकडून मोडल्या जात आहेत, असा आरोप सातत्याने ठाकरे गटाकडून होत आहे. यावरून एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. महापालिकेच्या ठेवी मोडल्या हा विरोधकांचा आरोप चुकीचा आहे. सध्या ८२ हजार ८०० कोटी रुपयांच्या ठेवी असूनही मुंबईतील विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली, असे ते म्हणाले. आरोप करणाऱ्यांना आम्ही कामातून उत्तर देतोय. त्यामुळेच मुंबईच्या तिजोरीत आज सात हजारांची भर पडली आहे.

मुंबईत आज ४३ हजार कोटींची विकासकामे केली जात आहेत. त्यामुळे एफडीबद्दलचे सगळे आरोप खोटे आहेत, ते वस्तुस्थितीला धरून नाहीत, असे एकनाथ शिंदे म्हणाले. याआधी मुंबईला लुटणारे लोक होते, त्यांना आम्ही आरसा दाखवला आहे. जे मुंबईला सोन्याची अंडी देणारी कोंबडी समजत होते, त्यांना आता अडीच वर्षात कसा विकास होऊ शकतो हे आम्ही दाखवले, अशी टीकाही शिंदे यांनी ठाकरे गटावर केली.



# शिर्डीतील साई संस्थानचा मोठा निर्णय:कर्मचाऱ्यांच्या कामाची वेळ बदलली; दुहेरी हत्याकांडानंतर वेळात बदल

**अहिल्यानगर (वृत्तसंस्था)**-शिर्डीतील साई संस्थानच्या कर्मचाऱ्यांची हत्या झाल्यानंतर आता संस्थानच्या वतीने काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या कामाची वेळ बदलण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना सकाळी चार ऐवजी आता सकाळी सहा वाजता कामावर यावे लागणार आहे. त्याचबरोबर या हत्याकांडात मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना विमा पॉलिसीच्या सर्व सुविधा मिळवून देण्यासाठी साई संस्थानच्या वतीने प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. संस्थानच्या वतीने घेण्यात आलेल्या वेळापत्रक बाबतच्या या निर्णयाची अंमलबजावणी ही आजपासूनच होणार आहे.

शिर्डीच्या साई संस्थानच्या २ कर्मचाऱ्यांची चाकूने भोसकून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. सोमवारी पहाटे दोन वेगवेगळ्या ठिकाणी या घटना घडल्या. या घटनेत अन्य एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. या हत्याकांडामुळे शिर्डी चांगलीच हादरली होती. या संदर्भात साई संस्थानच्या वतीने घेण्यात आलेला हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.सुभाष साहेबराव घोडे व नितीन कृष्णा शेजुळ अशी मृत कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तर कृष्णा देहरकर असे गंभीर जखमी तरुणाचे नाव आहे. कृष्णावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत कर्मचारी व जखमी तरुण सोमवारी पहाटे साई संस्थानच्या आपल्या नोकरीवर येत होते.



पण रस्त्यातच त्यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी प्राणघातक हल्ला केला. त्यात सुभाष व नितीन हे दोघेही जागीच ठार झाले. या दोघांवर तासाभराच्या अंतराने हल्ला करण्यात आला.हा हल्ला कशामुळे झाला? हे स्पष्ट झाले नाही. पण या घटनेमुळे अवघी शिर्डी हादरली आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पोलिसांना त्याची माहिती कळवली. पण पोलिसांनी तासभर विलंबाने घटनास्थळ गाठल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. इथे कुणीही कुणासाठी लगबगीने येत नाही, असा आरोप मृत तरुणाच्या कुटुंबीयांनी केला. या हत्येला अपघाताचे स्वरुप देण्यात येत असल्याचा आरोपही या प्रकरणी केला जात आहे. मृत सुभाष घोडे हे शिर्डीच्या करडोबा नगर चौकात राहत होते. त्यांच्यावर घरापासून काही अंतरावरच हल्ला करण्यात आला. तर नितीन शेजुळ व कृष्णा देहरकर यांच्यावर श्रीकृष्ण नगर भागात हल्ला झाला.मोफत अन्नछत्रामुळे शिर्डीत गुन्हेगारी वाढत आहे. सोमवारी पहाटेची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. खरे तर अशी घटना आधी कधी घडलेली नाही. मोफत अन्नछत्र, मोफत शिर्डी करून ठेवलीय. त्यामुळे गुन्हेगारी वाढली आहे. आम्ही जे बोललो होतो ते कोणत्या उद्देशाने बोललो होतो ते महाराष्ट्राला कळेल. हे प्लॅन मर्डर वाटत नाहीत. नशेतील रँडम मर्डर आहेत, असे सुजय विखे पाटील यांनी म्हटले आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी सरकारचा मोठा निर्णय

# लाडकी बहिणी योजनेच्या प्रसिद्धीसाठी 3 कोटींचा खर्च

**मुंबई (वृत्तसंस्था)**

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला राज्यात मिळालेल्या यशाचे श्रेय लाडकी बहीण योजनेला दिले जाते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहिणी योजनेच्या प्रसिद्धीसाठी तीन कोटी रुपयांच्या खर्चाला राज्य सरकारच्या वतीने मान्यता देण्यात आली आहे. मात्र, दुसरीकडे वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आता शिव भोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या योजनांना ब्रेक लावण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्य सरकारच्या लाकडी बहिण योजनेवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. मात्र या योजनेवर झालेल्या मोठ्या प्रमाणातील खर्चामुळे आता राज्य सरकार इतर काही योजना बंद करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा



सुरू झाली आहे. यात शिव भोजन थाळी आणि आनंदाचा शिधा अशा योजनांचा समावेश आहे. त्यामुळे या योजनांना आता ब्रेक लागणार असल्याचे बोलले जात आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना विधानसभा निवडणुकीच्या आधी जाहीर करण्यात आली होती. या योजनेला महिला वर्गातून मोठी लोकप्रियता मिळाली. त्यामुळेच महिला मतदारांनी महायुती सरकारला पुन्हा एकदा सत्तेवर बसवले, अशी चर्चा सुरू आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा पंधराशे रुपये दिले जातात. राज्य सरकारच्या वतीने विधानसभा निवडणुकीच्या आधी या माध्यमातून महिलांना पाच हप्ते तर निवडणुकीनंतर आतापर्यंत दोन हप्ते दिलेले आहेत. यात आतापर्यंत महिलांना दहा हजार पाचशे रुपये मिळाले आहेत. मात्र या योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवरील ताण वाढला आहे.

# देणार नव्हता तर शेतकरी कर्जमाफीची घोषणा का केली?:विजय वडेट्टीवार यांचा संतप्त सवाल

**नागपूर (वृत्तसंस्था)**

सरकार शेतकरी कर्जमाफी देऊ शकत नाही, मग घोषणा का केली? असा प्रश्न काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी विचारला आहे. जाहिराती देऊन सरकार पुन्हा दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जाहिरातीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. लाडकी बहिण योजनेच्या जाहिरातींच्या खर्चासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीवरुन वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त केला.

या माध्यमातमून राज्यातील शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. या संदर्भात विजय वडेट्टीवार म्हणाले की, या सरकारने अनिल अंबानी यांचे ४९ हजार कोटींचे कर्ज ५०० कोटी रुपये सेटलमेंट केले आहे. आतापर्यंत उद्योग क्षेत्रातील २९ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले आहे. मग शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी हाताला लखवा मारला का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात कर्ज माफ



केले जात आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठीच यांच्याकडे पैसे नाहीत का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार नसाल आणि त्यांची हाल करणार असाल तर शेतकरी तुम्हाला माफ करणार नाही. राज्यातील शेतकरी आज ना उद्या तुमच्या विरोधात उभे राहणार आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफीची घोषणा करूनही तुम्ही पैसे देत नाहीत. लोकसभा झाली, विधानसभा झाली मात्र जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये ईव्हीएममध्ये गडबड झाली नाही तर शेतकऱ्यांचा राग तुम्हाला नक्की दिसेल, असा इशारा देखील वडेट्टीवार यांनी दिला आहे.राज्यातील सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. या संदर्भात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नसंदर्भात यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यामध्ये मोर्चा काढण्याचे आम्ही ठरवले असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. ज्या शेतकऱ्यांचा सोयाबीन खरेदी झाला नाही, त्यांच्यासाठी सरकारला प्रश्न विचारणार असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.सरकारवर आरोप झाले तर तर नेते आमदार फुटणार, खासदार फुटणार, हा फुटणार तो फुटणार असे काहीतरी मुद्दे काढते. किंवा अर्बन नक्षलवाद असे शब्द वापरले जातात. काहीच नाही सापडले तर मुसलमान सारख्या शब्दांचा वापर केला जातो. किंवा मंदिर, मस्जिद खोदा असे धंदे सुरू होतात, असा आरोप देखील वडेट्टीवार यांनी केला आहे. आमदार, खासदार फुटण्याच्या वृत्तांत काहीही अर्थ नसून हे निराधार असल्याचा दावा देखील त्यांनी केला.

# मॉडर्न ग्रुप ऑफ स्कूल, गंगापूरचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## माजी विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आकर्षण ठरला

**गंगापूर । प्रा संजय तुपे**

मॉडर्न ग्रुप ऑफ स्कूल, गंगापूर येथे दिनांक ०५ फेब्रुवारी २५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाले. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून सर्व पालक प्रतिनिधी उपस्थित होते. शाळेच्या अध्यक्षा श्रीमती बिंदू विश्वंभरम, सचिव ओम मंगलम विश्वंभरम सर, प्राचार्या श्रीमती अपर्णा सोनटक्के, प्राचार्या श्रीमती कविता गवते, तसेच समन्वयक प्राध्यापक संजय तुपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांचे कौतुक केले. माजी विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा – यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार या स्नेहसंमेलनाचे विशेष आकर्षण म्हणजे माजी विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा. शाळेतून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. या विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा देत शाळेने त्यांना घडवण्यात कसा महत्त्वाचा वाटा उचलला, यावर प्रकाश टाकला.

**✽सन्मानित विद्यार्थी:**–डॉ. श्रद्धा गणेश टेमकर (वैद्यकीय क्षेत्र) डॉ. शशांक योगेंद्र वर्मा (वैद्यकीय क्षेत्र) साक्षी सुनील जोशी (उद्योग व व्यवस्थापन) सीए अभिजीत रामदास मोठे (चार्टर्ड अकाउंटंट) डॉ. राधिका आनंदकिशोर चेन्नई (वैद्यकीय क्षेत्र) डॉ. अपूर्वा रामनाथ गवळी (वैद्यकीय क्षेत्र) ऋतुजा श्रीनिवास सोमानी (एमबीए) (व्यवस्थापन क्षेत्र) अथर्व गणेश पदे (आयआयटी) (अभियांत्रिकी क्षेत्र) या सर्व माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना शालेय जीवनातील आठवणी सांगितल्या. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेतील शिक्षक, प्रशासन व पालकांच्या सहकार्याला दिले. त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाने उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली. पालक प्रतिनिधी आणि मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्यास पालक प्रतिनिधी म्हणून श्रीमती कोमल थोरे, शिल्पा बजाज, मंजू प्रजापती, कांचन मुंदडा, राजेंद्र दारुंटे, योगेश जाधव, डॉ. संदीप गायकवाड, संदीप अकोलकर,गजानन गायकवाड, सुनील थोरात, डॉ. रवींद्र ढवाळ, नानासाहेब चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, गुरुकृपा इन्स्टिटयूटचे संचालक अतुल कुलकर्णी यांचीही विशेष उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटक, गायन, देशभक्तिपर गीते सादर करून संमेलनाला रंगत आणली. तसेच, विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सध्याच्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा संजय तुपे आणि नफिसा मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राध्यापक संजय तुपे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम तसेच राष्ट्रगीताने झाली.



### केज येथे मराठवाडा जनता विकास परिषदेची बैठक संपन्न

# मराठवाड्याचा रखडलेला अनुशेष भरून काढण्या साठी प्रयत्न करायला हवेत–राजेसाहेब देशमुख

**केज । प्रतिनिधी**

मराठवाडा जनता विकास परिषदेचीबैठक मंगळवार दि.४ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झाली. बैठकीचे अध्यक्ष माजी सभापती अँड.राजेसाहेब देशमुख,केज शाखाध्यक्ष जी.बी.गदळे,हनुमंत भोसले,जनार्दन सोनवणे, मेजर अजिमोद्दीन इनामदार,जयपाल मस्के, विक्रम डोईफोडे,धनंजय कुलकर्णी,मधुकरशिरसाट श्रावणकुमार जाधव, संतोष गालफाडे,महादेव गायकवाड,चंद्रकांत पाटील,संतोष गालफाडे, धनंजय कुलकर्णी,प्रदिप गायकवाड,हनुमंत घाडगे, डॉ.हनुमंत सौदागर, कल्याणकर,राऊत, जनार्दन सोनवणे, नंदकुमार मस्के,प्रो. नवनाथ काशीद,नंदुलाल मिसाळ,जोगदंड विजय, गणेश चौधरी आदींची उपस्थिती




होती.यावेळी बोलतांना अड,राजेसाहेब देशमुख म्हणाले ग्रामीण विकासासाठी प्रमुखघटक पाणीआहे.मराठवाड्याला उजनी,कृष्णा खोरेचे २५ टीएमसी पाणी मिळाले पाहिजे.शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योग उभारले पाहिजेत.सर्वांचा कणा असलेला शेतकरी वाचवला पाहिजे,ग्रामीण भागाचा विकास करण्या साठी लढणे ही वैचारिक चळवळीतील लोकांची जबाबदारी आहे.असे मत व्यक्त केले.काळे यांनी ग्रामीण भागासाठी आरोग्य,शिक्षण,दळण वळण सुकर करण्यासाठी सर्वांनी संघर्ष करून सुविधांची मागणी करावी लागेल असे मत व्यक्त केले.मांजरा उद्यान,केज शहरातील विविध प्रश्न यावर सविस्तर चर्चा करण्यात आली विविध मागण्यांचे निवेदन देण्याचे निश्चित झाले. यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील पदाधिकाऱ्यां च्या निवडीबद्दल पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक जी.बी.गदळे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन हनुमंत घाडगे यांनी केले. या कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भडंगवाडीत मनरेगा योजनेत गैर व्यवहाराची तक्रार,चौकशीचे आदेश

**गेवराई । प्रतिनिधी**

मौजे भडंगवाडी (ता. गेवराई) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) वैयक्तिक लाभाच्या योजनासह मनरेगामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी पंचायत समिती गेवराईच्या गटविकास अधिकारी यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत.

ग्रामस्थ बाळू तोडेकर यांनी पंचायत समितीकडे दिलेल्या तक्रारीनुसार, शेतकरी विष्णू काशिनाथ धनाडे यांच्या नावे गायगोठा आणि जलसिंचन विहीर या वैयक्तिक लाभाच्या योजनांचे प्रस्ताव परस्पर दाखल करून अनधिकृतरीत्या रक्कम उचलण्यात आली. हा प्रकार उघड होताच ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आणि अधिकृत चौकशीची मागणी केली.यासंदर्भात पंचायत समितीने उपअभियंता संजीव चोपडे, शाखा अभियंता व्ही. एम. सासवडे, तसेच तांत्रिक सहाय्यक जगताप आणि लोणकर यांना पाच दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, भडंगवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामरोजगार सेवकांना चौकशीदरम्यान सर्व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.दरम्यान, या प्रकरणातील गैरव्यवहाराचा तपशील समोर आल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रांजणी ग्रामपंचायत कार्यालयात रमाई जयंती उत्साहात साजरी

**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी ग्रामपंचायत कार्यालयात शुक्रवारी माता रमाई (रमाबाई आंबेडकर) जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांचे अभिवादन करण्यात आले.

यावेळी सरपंच अमोलभाऊ देशमुख, माजी सरपंच राधाकिसन जाधव, उपसरपंच शेख रहिम, ग्रामपंचायत सदस्य दिपक वरखडे, कैलास वरखडे, ज्ञानेश्वर शिंगणे, शिवाजी पाटोळे, रमण जाधव, सोनवणे, विजयकुमार खुळे, अंबादास वाघमारे, कैलास जाधव, देवराव सराटे, नंदुसिंह तौर, दामू जाधव, शेख मोसीक, अनिल लगामे, सिध्दार्थ सराटे, विजय कांबळे, प्रदिप जाधव यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाहीत पत्रकारांचे स्थान महत्वाचे-प्रा.ईश्वर मुंडे

## पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार संपन्न

**केज । प्रतिनिधी**

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसिध्दी माध्यमे आपले काम करत असतात.लोकशाही बळकटीकरणात पत्रकारांचे योगदान महत्वाचे असून शासनाच्या विविध लोक कल्याणकारी योजनांच्या प्रसार प्रचारा सोबतच शासनाच्या चुकीच्या धोरणाचे प्रमुख विरोधी पक्ष म्हणून माध्यमांचे प्रतिनिधी काम करत असतात.त्यांचाही समाजात यथोचितसन्मान होणे आवश्यक असते असे मत प्रा.ईश्वर मुंडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या केजतालुका नुतन पदाधिकारी यांच्या नुकत्याच निवडी झाल्या.

यामुळे केज येथे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील,कार्याध्यक्ष नंदूलाल मिसाळ,सचिव विजय बिक्कड,उपाध्यक्ष प्रदिप गायकवाड यांचा प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी सेलचे राज्य प्रमुख तथा ईश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव प्रा.ईश्वर मुंडे यांनी हृदय सत्कार केला. यावेळी ते बोलत होते.यासत्काराबद्दल केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील व कार्याध्यक्ष नंदूलाल मिसाळ यांनी प्रा.ईश्वर मुंडे यांचे आभार मानले.



### मनोज संकाये यांच्या मागणीला यश


# डॉ.शामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावरील खोदलेला रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरुस्त

## विविध दैनिकांनी दिलेल्या बातमीची दखल घेत मागणी पूर्ण

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांच्या सह त्यांच्या मित्र मंडळाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी केली होती तसेच विविध दैनिकानी याची बातमी प्रकाशित केली म्हणून सार्वजनिक विभागाने हा रस्ता केला याबद्दल विभागाचे अधिकारी व संपादक/ पत्रकार बांधवांचे यांचे त्यांनी आभार मानले आहेत.

दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजि विविध दैनिकात बातमी प्रसिद्ध झाली होती तसेच वाहतुकीचा रहदारीचा प्रश्न मार्गी लागला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. यामध्ये पाठ दुःखी,कंबर दुखी, श्वसनाचे विविध आजार यांचा समावेश आहे. याची दखल घेतली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने रस्ता दुरुस्त झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून अँड.मनोज संकाये मित्र मंडळाचे आभार मानले आहेत.



## माता रमाई जयंती निमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा व खिचडी वाटप



**परळी । प्रतिनिधी**

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहाने माता रमाई जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आले होत्या. स्पर्धेचे उद्घाटन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रताप समिंदर सावळे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यागमुर्ती रमाई भिमराव आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भीम नगर जगतकर गल्ली येथ येथे लार्ड बुध्दा फाउंडेशन व रमाई अर्बन निधी यांच्यातर्फे जयंती मध्ये सहभागी बांधवांना खिचडी वाटप केले. त्यामध्ये प्रामुख्याने अध्यक्ष प्रताप समिंदरसवळे,राज जगतकर, सुमेर समिंदरसवळे, विक्रांत समिंदरसवळे, सुमेध जाधव, परमेश्वर अवचारे, महेश मस्के, राहुल गायकवाड, यश बनसोडे, अमर अवचारे, खिचडी वाटपाचा कार्यक्रम यशस्वी केला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077